दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 22-08-2024

दक्षता • मुलांसह पालकांनीही सजग राहण्याची गरज असल्याचे प्रतीक्षा पांगे यांचे प्रतिपादन

# सायबर गुन्हेगारी जनजागृतीअंतर्गत मार्गदर्शन

प्रतिनिधी | उमरगा

बदलत्या काळामध्ये आपण लहानापासून जेष्ठापर्यंत सर्वजण मोबाईल,यूट्यूब इंटरनेटचा, विविध ॲप्सचा मोठ्या प्रमाणामध्ये वापर आपल्या सोयीसाठी करत असतो, मात्र या सोबतच इंटरनेटच्या माध्यमातून होणारे सायबर गुन्हे याबाबत मुलांसह पालकांनी सजग असणे फार गरजेचे आहे, असे मत राजर्षी शाहू कॉलेज क्विक हिल फाऊंडेशन सचिव प्रतीक्षा पांगे यांनी व्यक्त केले.

शरणप्पा मलंग विद्यालयात महाराष्ट्र सायबर विभाग व क्विक हिल फाऊंडेशनच्यावतीने २० ऑगस्ट रोजी सायबर गुन्हे जनजागृती अभियान यावेळी पांगे बोलत होत्या.



मलंग विद्यालयात सायबर गुन्हे या बाबत प्रतिक्षा पांगे बोलताना

मुख्याध्यापक अजित गोबारे अध्यक्षस्थानी होते. यावेळी रमेश पांगे उपस्थित होते. पुढे बोलताना प्रतिक्षा पांगे म्हणाल्या की, आपल्या घरातील फोनवर अनेक वेळा फ्रॉड कॉल येतात की, तुम्ही लॉटरी जिंकला आहात असे सांगितले जाते. ते मिळवण्यासाठी तुमचा अकाउंट नंबर, आधार नंबर, पॅन नंबर, एटीएम कार्ड नंबर, पिन नंबर इत्यादी विचारले जाऊन फसवणक होऊ शकते. किंबहुना समाजात अशी अनेक उदाहरणे आपणास पाहायला मिळतात. सध्याचे विद्यार्थी/समाजातील जास्तीत जास्त व्यक्ती फेसबुक, इन्स्टा व व्हाट्सअप या ॲप्सकडे आकर्षित झालेले दिसून येतात, इन्स्टा व फेसबुकला आपण ठेवलेला प्रोफाइल फोटो व व्हाट्स ॲपचा डीपी वापरून आर्टिफिशियल इंटेलिजन्स मदतीने तमचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या शरीराला जोडला जावून त्याचा गैरवापर केला जाऊ शकतो,म्हणून आपण आपले इंस्टाचे अकाउंट प्रायव्हेट ठेवले पाहिजे. शक्यतो डीपी व प्रोफाइल फोटो ठेवणे टाळले पाहिजे,आपल्या अकाउंटचा कोणी चुकीचा वापर करू नये म्हणून जी-मेल अकाउंटचे पासवर्ड स्ट्रॉंग असले पाहिजे म्हणजे त्यात नंबर्स कॅरेक्टर्स चिन्हे याचा वापर असला पाहिजे. शेवटी सायबर गुन्ह्यापासून सर्व जण सावध राहण्यासाठी कु पांगे यांनी विद्यार्थी, शिक्षक व पालकांकडून शपथ वदवून घेतली.

विज्ञान शिक्षक परमेश्वर सुतार यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले. यशस्वीतेसाठी सहशिक्षक राजकुमार जाधव, आगतराव मुळे, सतीश कटके व इतरांनी परिश्रम घेतले.